फयान चक्रीवादळामुळे व अतिवृष्टीमुळे मच्छिमारांच्या झालेल्या नुकसानीपोटी त्यांना द्यावयाचे सानुग्र अनुदान.

महाराष्ट्र शासन -
कृषी,पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, -
शासन आदेश क्रमांक:मत्स्यवि २००९/प्र.क्र.१३५/पदुम-१४ -
मंत्रालय,मुंबई-३२. -
दिनांकः-२५ नोव्हेंबर,२००९. -

**प्रस्तावना**:-

राज्यात दिनांक १० व ११ नोव्हेंबर,२००९ रोजी फयान चक्रीवादळ व अतिवृष्टी या नैसर्गिक आपत्तीमुळे मुंबई शहर,मुंबई उपनगरे, ठाणे,रत्नागिरी व सिंधुदुर्ग या सागरी जिल्हयातील मच्छिमारांचे व त्यांच्या व्यवसायाचे मोठया प्रमाणात नुकसान झाले आहे. यामध्ये प्रामुख्याने नौका मोडतोड होणे, वाहुन जाणे, समुद्रात बुडणे यामुळे मासेमारांच्या जाळयांचे मोठया प्रमाणत नुकसान झाले आहे.याकरीता मच्छिमारांना सानुग्र अनुदान देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय**:-

फयान चक्रीवादळामुळे राज्यातील सागरी जिल्हयांमध्ये समुद्रामध्ये मासेमारी करण्याकरीता गेलेल्या मच्छिमारांच्या साधनांचे मोठया प्रमाणात नुकसान झालेले आहे.मा.मंत्रिमंडळाने दिनांक १९.११.२००९ रोजी राज्यातील सागरी जिल्हयातील मच्छिमारांना एक विशेष बाब म्हणून सानुग्र अनुदान मंजूर करण्याबाबतचा निर्णय खालीलप्रमाणे घेण्यात आला आहे. त्यासाठी रुपये १३ कोटी ९४ लक्ष इतका खर्च प्राथमिक अहवालानुसार मंजूर करण्यात आला आहे.

| अ.क्र. | बाब | अर्थसहाय्याचे प्रमाण | अर्थसहाय्य प्रमाणात मंजूर तरतूद | अर्थसहाय्य मंजूर करण्याचे निकष |
|---|---|---|---|---|
| १ | पूर्णपणे नष्ट/बेपत्ता बुडालेल्या छोटया नौकांसाठी द्यावयाचे सानुग्रह अनुदान | बोटीच्या किंमतीच्या ५० टक्के किंवा नुकसानीच्या पंचनाम्यात नमुद केलेली रक्कम प्रति नौका रु.६०,०००/- च्या कमाल मर्यादेच्या अधिन राहून या पैकी कमी असेल ती रक्कम अदा करण्यात यावी | रु.१ कोटी | नौकेचा विमा उतरविलेला होता किंवा नाही, ही बाब विचारात न घेता तसेच त्यांनी यापूर्वी शासनाच्या कोणत्याही योजनेतुन अनुदानाचा वापर केला आहे याबाबी विचारात न घेता विशेष बाब म्हणून पंचनाम्यानुसार सानुग्रह अनुदान अनुज्ञेय राहील. |
| २. | पूर्णपणे नष्ट/बेपत्ता/बुडालेल्या मोठया नौका (trawlers) द्यावयाचे सानुग्र अनुदान | प्रति नौका रु.२,००,०००/- अनुदान | रु.२४ लक्ष | नौकेचा विमा उतरविलेला होता किंवा नाही, ही बाब विचारात न घेता तसेच त्यांनी यापूर्वी शासनाच्या कोणतेही योजनेतुन अनुदानाचा वापर केला आहे याबाबी विचारात न घेता विशेष बाब म्हणून पंचनाम्यानुसार सानुग्रह अुनदान अनुज्ञेय राहील. |
| ३. | वाहून/बुडालेली/नष्ट झालेली छोटया जाळी यांना द्यावयाचे सानुग्र अनुदान | छोटया जाळयांसाठी साठी प्रति जाळी रु.१०,०००/- किंवा पंचनाम्यात | रु.१२.२० कोटी | सदरचे जाळे मच्छिमारांनी विकत घेण्यासाठी कर्ज घेतले आहे याची नोंद सदर |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | नमुद केलेली रक्कम यापैकी कमी असेल ती रक्कम सानुग्रह अनुदान म्हणून देय राहील | | विभागातील नोंदणीकृत मच्छिमार सोसायटीमध्ये किंवा ज्या बँकेतुन कर्ज घेतलेले आहे या बाबतचा पुरावा किंवा जाळे त्यांच्या मालकीचे ओह या बाबत चा सबळ पुरावा मत्स्यव्यवसाय विभागीतल अधिकाऱ्यांने तपासून घ्यावयाचा आहे.त्याची नोंद पंचनाम्यात करणे आवश्यक आहे. |
| ४. | वाहून/बुडालेली/नष्ट झालेली मोठया जाळी यांना द्यावयाचे सानुग्रह अनुदान | मोठया जाळयांसाठी प्रति जाळी रु.२५,०००/- किंवा पंचनाम्यात नमुद केलेली रक्कम या पैकी कमी असेल ती रक्कम सानुग्रह अनुदान म्हणून देय राहील. | रु.१२.२० कोटी | |
| ५. | ५० टक्के पर्यंत नुकसान झालेल्या मासेमारी नौकांना द्यावयाचे सानुग्रह अनुदान | प्रति नौका रु.१०,०००/- अनुदान किंवा पंचनाम्यात नमुद केलेली रक्कम या पैकी कमी असेल ती रक्कम सानुग्र अनुदान म्हणून देय राहील. | रु.५०लाख | ---- |

वरीलप्रमाणे अर्थसहाय्य मंजूर केल्यानुसार मच्छिमारांना आर्थिक मदत देण्याकरिता मागणी क्र.डी-६,२४०५,मत्स्यव्यवसाय,१०३ सागरी मत्स्यव्यवसाय (०१) (०५) नैसर्गिक आपत्तींमुळे आपदग्रस्त मच्छिमारांना सानुग्रह अनुदान वाटप ३१ सहाय्यक अनुदाने (२४०५४८६७) योजनेत्तर/दत्तमत्त या लेखाशिर्षाखाली खर्च नोंदवावा व हा खर्च शासन ज्ञापन वित्त विभाग क्र.आकनि-११.०९/४२/अर्थसंकल्प-१५,दिनांक २४ नोव्हेंबर,२००९ अन्वये मंजूर केलेल्या रु.१३.९४ कोटी इतक्या आकस्मिकता निधीद्वारे प्राप्त होणाऱ्या रकमेतून भागविण्यात यावा.

सदरहू रक्कम कोषागारातून काढण्यासाठी आहरण व संवितरण अधिकारी म्हणून सर्व सागरी जिल्हयातील सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय यांना घोषित करण्यात येत आहे व नियंत्रण अधिकारी म्हणून आयुक्त मत्स्यव्यवसाय यांना घोषित करण्यात येत आहे. सहाय्यक मत्स्यव्यवसाय आयुक्त, यांनी देयके सादर करण्यापूर्वी 'शासन ज्ञापन वित्त विभाग आकनि-११.०९/४२/अर्थसंकल्प-१५,दिनांक २४ नोव्हेंबर,२००९ अन्वये (संगणक सांकेतांक ८०००४९४२) मंजूर केलेले' अशा स्पष्ट सूचना लाल शाईने अधोरेखित कराव्यात. त्याचप्रमाणे शासन परिपत्रक,वित्त विभाग क्र.सीएनएफ.१०८३/१४०/अर्थसंकल्प-३,दिनांक २६.४.१९८३ व शासन परिपत्रक,वित्त विभाग क्र.सीएनएफ १०८३/१६३/अर्थसंकल्प-३,दिनांक २८.८.१९८६ अन्वये केलेल्या सूचनांची अंमलबजावणी काटेकोरपणे करावी.

आयुक्त मत्स्यव्यवसाय यांनी पंचनामा व निधी वाटपा संदर्भातील आपल्या मार्गदर्शक सूचना तात्काळ निर्गमित कराव्यात व त्यानुसार विहीत पध्दतीचा अवलंब करुन संबंधित जिल्हयाच्या सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय यांनी कोषागारातून रक्कम आहरित करुन विहीत केलेल्या निकषानुसार आपदग्रस्तांस मदत देण्याची कार्यवाही तात्काळ अमलांत आणावी.

हे आदेश वित्त विभागाच्या सहमतीने व त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र.२०६/०९/व्यय-१ व अनौपचारिक संदर्भ क्र.३४०/०९अर्थसंकल्प-१५,दिनांक २४.११.२००९ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदरचा शासन निर्णय हा (www.maharashtra.gov.in) या वेबसाईटवर उपलब्ध आहे त्याचा सांकेतांक क्र.२००९११२५१६०१०१००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(सु.तु.शेंडे),
अवर सचिव,महाराष्ट्र शासन

प्रति, -

आयुक्त मत्स्यव्यवासाय, महाराष्ट्र राज्य,मुंबई (५ प्रती) -

प्रादेशिक आयुक्त मत्स्यव्यवसाय,महाराष्ट्र राज्य,मुंबई, (५ प्रती)

सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय,मुंबई/ठाणे/रायगड/रत्नागिरी/सिंधुदुर्ग

महालेखापाल,महाराष्ट्र राज्य,१/२ (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता),मुंबई/नागपूर

अधिदान व लेखा अधिकारी,मुंबई
जिल्हा कोषागार अधिकारी,मुंबई/ठाणे/रायगड/रत्नागिरी/सिंधुदुर्ग
सहाय्यक कोषागार अधिकारी,पालघर (ठाणे)/अलिबाग(रायगड)/मालवण (सिंधुदुर्ग)
वित्त विभाग (व्यय-१/अर्थसंकल्प-१५/अर्थसंकल्प-३),मंत्रालय,मुंबई-३२.

प्रत,

मा.मुख्यमंत्री यांचे सचिव,महाराष्ट्र राज्य,मुंबई
मा.मंत्री (वित्त व नियोजन) यांचे खाजगी सचिव,महाराष्ट्र राज्य,मुंबई
मा.मंत्री (मत्स्यव्यवसाय) यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र राज्य,मुंबई
मा.राज्यमंत्री (मत्स्यव्यवसाय) यांचे खाजगी सचिव,महाराष्ट्र राज्य,मुंबई
मा.मुख्य सचिव यांचे सह सचिव,महाराष्ट्र राज्य,मुंबई
मा.अतिरिक्त मुख्य सचिव (मदत व पुनर्वसन),मंत्रालय,मुंबई
निवडनस्ती